महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, पुणे ४११००५

Maharashtra State Board Of Secondary &
HIGHER SECONDARY EDUCATION PUNE 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX- 020/25536761 |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / 25536712(OFF) | E-MAIL sscboardpune@gmail.com |


जा.क्र.पुविमं/उमा-अ/ 411
पुणे ४११ ००५
दिनांक 19 /०१/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर व सोलापुर

विषय- इ.१० वी व १२ वी परीक्षेकरीता श्रेणीसुधार (Class Improvement) योजनेच्या अटी व शर्तीसंदर्भात..
संदर्भ- राज्य मंडळ पत्र जा.क्र.रा.मं/ परीक्षा-८/४४८८ दि.१७.१२.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय राज्य मंडळ पत्रानुसार इ.१० वी व इ. १२ वी प्रमाणपत्र परीक्षेतील दि.०४.१०.२०२४ कार्यकारी परिषदेमधील ठरावातील काही अटी व शर्तीसंदर्भात दि.१७.१०.२०२५ रोजीच्या कार्यकारी परिषदेमधील ठरावातील चर्चेनुसार मान्य झालेल्या अटी व शर्ती आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | दि.०४.१०.२०२४ कार्यकारी परिषदेमधील निश्चित केलेल्या अटी व शर्ती | सुधारित अटी व शर्ती दि.१७.१०.२०२५ रोजीची कार्यकारी परिषद |
|---|---|---|
| १ | मुद्दा क्र.१० मधील<br>४.एका महिन्यापर्यंत मागणी केल्यास गुणपत्रिका विनाशुल्क देण्यात येईल व तदनंतर पाच महिने कालावधीपर्यंत प्रतिमाह रू.५००/- याप्रमाणे शुल्क आकारून विद्यार्थ्यांना गुणपत्रिका घेता येईल.<br>५.ज्या विद्यार्थ्यांनी निकालानंतर सहा महिन्यापर्यंत विकल्प दिला नाही, त्या विद्यार्थ्यांना त्यानंतर पुढील सहा महिन्यापर्यंत राज्य मंडळाच्या मान्यतेने प्रतिमाह रु ५००/- याप्रमाणे शुल्क आकारून विद्यार्थ्यांना निकाल देता येईल. | मुद्दा क्र.१० मधील<br>दि.०४.१०.२०२४ रोजीच्या कार्यकारी परिषदेमधील निश्चित केलेल्या अ.क्र.१ ते ५ मधील अटी व शर्ती कायम राहतील.<br>६. निकालानंतर ०१ वर्षाच्या कालावधीनंतर राज्य मंडळाच्या मान्यतेने प्रतिमाह रु ५००/- याप्रमाणे शुल्क आकारून विद्यार्थ्यांना निकाल देता येईल.<br>७. श्रेणी सुधारच्या तिस-या संधीनंतर ६ महिनेपर्यंत निकाल जतन करून ठेवावा. |

| अ. क्र. | दि.०४.१०.२०२४ कार्यकारी परिषदेमधील निश्चित केलेल्या अटी व शर्ती | सुधारित अटी व शर्ती दि.१७.१०.२०२५ रोजीची कार्यकारी परिषद |
|---|---|---|
| २ | मुद्दा क्र.१२<br>श्रेणीसुधार योजनेखाली प्रविष्ठ विद्यार्थ्याने नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरविल्यास त्या गुणपत्रिकेवर (Class Improvement Scheme)असा उल्लेख असेल. | सदर अट रद्द करण्यात येत आहे.<br>तसेच श्रेणीसुधार योजनेखाली प्रविष्ठ विद्यार्थ्याने नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरविल्यास त्या गुणपत्रिकेवर (Class Improvement Scheme)असा उल्लेख करण्यात येवू नये. |
| ३ | .................................. | निकालाच्या कायमस्वरुपी अभिलेखात विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर श्रेणी सुधार अशी नोंद करण्यात येवू नये.(applicable only to board office) |
| ४ | मुद्दा क्र.३<br>एकाच वेळी श्रेणी सुधार (Class Improvement Scheme)व तुरळक विषय (Isolated) घेवून प्रविष्ठ होता येणार नाही. | सदर अट रद्द करण्यात येत आहे. |

याबाबत संदर्भीय पत्र क्र.१ मधील उर्वरित अटी व शर्ती कायम ठेवण्यात आल्या आहेत.

सदरील पत्राचे व्यवस्थित अवलोकन करुन आपल्या स्तरावरुन सदरील बाबी श्रेणीसुधार योजनेतील प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 19-01-2026
12:01:44

(डॉ. मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव (प्र.),
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५



e:\vandana more\vandana more\e-office 2025.docx